**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३९०/२०२२**

**सलमा विरुध्द हैदर व इतर**

**निशाणी १० खालील आदेश**

(पारीत दिनांक ०३/०४/२०२३)

सदरील अंतरिम पोटगीचा अर्ज अर्जदार हिने कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदारला संरक्षण, निवासस्थान व दरमहा एकुण २५,०००/– अशी अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदरांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार चे गैरअर्जदार क्र.१ सोबत मुस्लीम रितीरिवाजा प्रमाणे दिनांक १६/०५/२०११ रोजी कामठी येथे अर्जदारच्या वडीलांच्या घरी झाले. अर्जदार हि लग्नानंतर गैरअर्जदारांसोबत सासरी नांदन्यास गेली. लग्ना नंतर गैरअर्जदार हे ५ वर्ष अर्जदार सोबत चांगले राहिले. त्यानंतर अर्जदार ला मुलबाळ होत नाही म्हणून गैरअर्जदार हे अर्जदारला मारपीट करत होते व तिसरे लग्न करण्याची धमकी देत होते व तलाक दे असे म्हणून मारपीट करीत होते. गैरअर्जदार हे अर्जदारला पोट भरुन जेवण देत नव्हते व तेरे को भुख लगती तो भिक मंगके खा असे म्हणून घराबाहेर काढत होते व अर्जदारला घरामध्ये येवू देत नव्हते. अर्जदार ही गरीब घरची मुलगी असल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ व २ हे झगडा भांडण करुन मारपीट करीत होते. गैरअर्जदार क्र.१ चे दुस–या बाईसोबत प्रेमसंबंध आहे तो जास्तीत जास्त

तिच्या सोबत राहतो. अर्जदारला मुलबाळ होत नाही म्ळणून दवाखान्यात टेस्ट केल्या असता त्या सर्व नॉर्मल होत्या आणि डॉक्टरांनी गैरअर्जदार क्र.१ याच्या मध्ये काही त्रुटी असल्याचे सांगितले व त्याचा उपचार केला तर मुलबाळ होउ शकते असे सांगितले परंतु गैरअर्जदार क्र.१ उपचार करत नाही आणि मुलबाळ होत नाही याचा दोष अर्जदार हिला देतात. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने अर्जदारचे असे कथन आहे की गैरअर्जदार क्र.१ कडे १०० एकर शेती आहे व तो महिन्याला रुपये ७०,०००/- कमवितो. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा निकाल होईपर्यंत अर्जदारला गैरअर्जदार कडून रुपये २५,०००/- अंतरिम पोटगीचा आदेशा व्हावा.

३. गैरअर्जदार यांनी आपले म्हणणे (निशाणी ९) वर दाखल केले आहे. त्याने अर्जातील कथने नाकारली आहे. विशेष कथनामध्ये त्यांनी कथन केले आहे की गैरअर्जदार हे वाशिम शहरातील प्रतिष्ठीत नागरीक आहेत. अर्जदार हिने खोटे बनावट दस्तांचे आधारे खोटा अर्ज न्यायालयात सादर केला आहे. तिने दाखल केलेला निकाहा नामा पूर्णतः बनावट खोटा आहे. तसेच मुलबाळ होत नाही म्हणून दवाखान्यात उपचार केलयाचे अर्जदारने नमूद केले आहे परंतु त्याबाबतचा एकही दस्त अथवा पुरावा सादर केलेला नाही. पुढे त्यांनी अर्जदार ही कधीही गैरअर्जदार यांच्याकडे नांदण्यास आलेली नसल्याने तिला कोणत्याही प्रकारचे कौटुंबिक हिंसाचार झालेली नाही. तसेच गैरअर्जदार क्र.१ कडे १०० एकर शेती असल्याचे व त्याला ७०,०००/- रुपये प्रतिमाह उत्पन्न

असल्याचे गैरअर्जदारने नाकारले आहे. त्यामुळे अर्जदारचा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व युक्तीवादानुसार खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले व त्याचे निष्कर्ष मी खालील कारणांसही देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही संकृतदर्शणी तिचे बाबतीत गैरअर्जदार कडून कौटुंबिक हिसाचाराचे कृत्य घडले हे शाबीत करते काय ? | ... होकारार्थी |
| २. | अर्जदार अंतरीम संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | ... होकारार्थी |
| ३. | अर्जदार दरमहा रुपये २५,०००/- अर्ज दाखल तारखेपासून ते अर्ज निकाल होईपर्यत निवाह भत्ता मिळण्यास पात्र आहे काय ? | ... अंशतः होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता –**

५. अंतरिम अर्जावर आदेश करताना केवळ प्रथमदर्शनी पुरावा विचारात घ्यावा लागतो. सकृतदर्शनी अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचारास बळी पडली किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज, मुळ अर्ज व गैरअर्जदार यांचे म्हणणे याचे अवलोकन केले असता, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना त्याच्या मधील विवाहीक नाते मान्य नसल्याचे दिसून येते. तसेच ते एकत्र राहत होते ही बाब देखील मान्य नसल्याचे दिसून येते. तथापि अर्जदारने निशाणी ४/२ कडे निकाहनामा दाखल केला आहे, त्यावरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाल्याची बाब प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदारच्या अर्जामधील कथनांवरुन प्रथमदर्शनी अर्जदारच्या बाबतील गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांचे कडून कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडल्याचे दिसून येते.

७. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांनी परस्पराविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप केले आहे व नाकारले आहे. तसेच वैवाहिक नाते देखील विशेषतः गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांनी नाकारले आहे. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे केवळ प्रथमदर्शनी अर्जदार हिचे बाबतीत कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडले आहे हि बाब शाबीत करते अगर कसे हे पाहणे महत्वाचे आहे. अर्जदारने अर्जामध्ये केलेल्या कथनावरुन तिचे बाबतीत कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांचे कडून घडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब अर्जदार हि गैरअर्जदारा कडून अंतरीम संरक्षण आदेश व अंतरीम आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे.

८. अर्जदार ने गैरअर्जदार क्र.१ याची १०० एकर शेती असल्याचे व दरमहा रुपये ७०,०००/– कमवित असल्याचे कथन केले आहे. परंतु अर्जदारने गैरअर्जदार

क्र.१ च्या नेमच्या उत्पन्ना बाबतचा पुरावा सादर केलेला नाही. तथापि, पत्नी या नात्याने अर्जदाराचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अशा परिस्थितीत सद्यः स्थितीच्या महागाईच्या दराचा विचार करता, एका व्यक्तीला प्रति दिन खर्च रुपये १००/– इतका येतो असे मानले तर अर्जदार हि गैरअर्जदार क्र.१ कडून रुपये ३०००/– प्रती महिना अंतरीत पोटगी मिळण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देउन मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांनी अर्जदारचे बाबतीत कौटुंबिक हिंसाचार करु नये असा अंतरीम संरक्षणाचा आदेश देण्यात येतो.

३. गैरअर्जदार क्र.१ ला आदेशीत करण्यात येते की अर्जदारला रुपये ३०००/– (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) दरमहा मुळ अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यत अंतरीम पोटगी दयावी.

४. सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

**स्वाक्षरी/–**

ठिकाण – कामठी

दिनांक –०३/०४/२०२३

(अमित अ. कुळकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, कामठी.